जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१६/०२/२०२४
## दि.१५/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ९५/२०२४,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५३ वर्षे रा.वडगाव बुाा पुणे |
| **आरोपीत** | अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०२/२०२४ रोजी सायं.१६/४५ वा.चे सुमा.हर्षवर्धन प्राइडचे बिल्डींग समोर पी के बिर्याणी जवळ शेळकेनगर वडगाव बुाा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया नमुद ठिकाणावरून पायी जात असताना,नमुद अनोळखी इसम हा फिर्यादी यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील ५०,०००/-रू किं.चे सोन्याचे गंठण जबरी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अक्षय पाटील मो.नं ९९२२२१०११० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ८५/२०२४,भादविक ३२५,३३३,३५३,१४३,१४७,१४९,५०४ |
| **फिर्यादी** | शेरखान पठाण, तुरुंगाधिकारी श्रेणी-२, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे |
| **आरोपीत** | १२ न्यायलयीन बंदी (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०२/२०२४ रोजी स.०९/३० चे सुमा. येरवडा मध्यवर्ती कारागृहातील सर्कल क्र.१ मधील मोकळ्या जागेत |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे तुरुंगाधिकारी श्रेणी-२ या पदावर काम करीत असुन नमुद वेळी फिर्यादी हे त्यांचे कायदेशीर कामकाज करत असताना नमुद ठिकाणी ते बसलेले असताना नमुद न्यायालयीन बंदी यांनी त्यांची बराक बदलल्याचा राग मनात धरून फिर्यादी यांना शिवीगाळ करून हाताने मारहाण करून फिर्यादी यांचा हात फ्रॅक्चर केला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शिवराम खाडे, मो.नं.७०२८३७४२७३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ३३/२०२४,भादविक ३०४(२) |
| **फिर्यादी** | गणेश फरताडे पोलीस उप निरीक्षक,विश्रामबाग पोलीस ठाणे, पुणे शहर |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०२/२०२४ रोजी १३/३०वा.सुमा.रुम नं.३३,बिल्डींग नं.०१,पीएमसी कॉलनी,बेलेश्वर मंदिराचे मागे,राजेंद्रनगर,पुणे येथे पॅसेजमध्ये |
| **तपशिल** | विश्रामबाग पो स्टे अ.मयत रजि.नं. ०८/२०२३,सीआरपीसी १७४ अन्वये मयताचे झाले तपासाचे चौकशीअंती कागदपत्राचे अवलोकन करता,यातील नमुद इसम याने मयत प्रदिप परशुराम शिंदे, वय ३२ वर्ष हा दारुचे नशेत असुन त्याला धक्काबुक्की केली असता तो खाली पडुन इजा होवु शकते याची जाणीव असताना. याला बेजबाबदार पणे जाणीवपुर्वक त्याला ढकलले असता तो दारुच्या नशेमुळे तोल जावुन भिंतीवर आदळुन खाली पडला त्यात झालेल्या जखमांमुळे त्याचा मृत्यु झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.वाघमारे मो.नं.८६९१९३००२४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ९७/२०२४,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३६ वर्षे रा.मु.पो.खेराडेवांगी ता.कडेगाव जि.सांगली |
| **आरोपीत** | अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०२/२०२४ रोजी दु.१६/४० वा.चे सुमा. ग्रॅन्डयुअर सोसा.नऱ्हे चे पाठीमागील गेटवर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या नमुद ठिकाणावरून पायी जात असताना दुचाकीवरून आलेल्या नमुद इसमाने फिर्यादीच्या गळयातील ३५,०००/- किं.चे सोन्याचे गंठन जबरदस्तीने हिसकावून घेवुन गेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अशोक सणस मो.नं.९८२२२०८११२ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ८१/२०२४,भादविक ३०४(अ)२७९,३३८,मो.वा.का.कलम १८४,११९/१७७,१३२ (१) (क) |
| **फिर्यादी** | नामदेव घुगे वय २४ वर्षे रा.आव्हाळवाडी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात कार चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि. १४/०२/२०२४ रोजी रात्री २१/०० वा.सुमा. गॅलेक्सी १ सोसायटी चौक खराडी पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मोटार सायकल वरून मयत इसम विनोद कालीका यादव वय ३८ वर्षे रा.शुभम सोसायटी जवळ वडगावशेरी पुणे यांस मुंढव्याबाजूकडे घेऊन जात असताना नमुद कार चालकाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे गाडीला जबर ठोस मारून,त्यांना खाली पाडून मयत इसम यांस गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.खांडेकर मो नं ९५२९७९६००६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे १४५/२०२४,भादविक ३९२,४६२,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ८४ वर्षे रा.भावडी गाव ता हवेली जि पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि ०१/०२/२०२४ रोजी रात्री २१/०० वा ते २२/०० वा चे सुमा.हांडगर वस्ती, भावडी ता हवेली जि पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद इसम हे एकमेकांचे ओळखीचे असुन नमुद वेळी त्या तीन इसमांनी संगनमत करुन फिर्यादी यांचे गळयातील ९०,०००/- रू.कि.चे सोन्याचे गंठण धक्काबुक्की करुन हिसकावुन नेले व तुझा मुलगा कुठे आहे सांग नाहीतर तुला आज सोडणार नाही अशी धमकी दिली व ते अंधाराचा फायदा घेवुन तेथुन पळून गेले (फिर्यादी यांचे नातेवाईक घरी आले वर तक्रार दिलेली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.राहुल कोळपे मो नं.९६५७२६१०१० |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे ७३/२०२४,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५० वर्षे रा.खांदवेनगर, पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०२/२०२४ रोजी स.०९/३० वा. ते दि.०५/०२/२०२४ रोजीचे दरम्यान नाशिक पुणे प्रवास ते वाकडेवाडी शिवाजीनगर बस स्टँड ते फिर्यादीचे राहते घरा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांची सुन असे नाशिक ते पुणे असा एस टी ने प्रवास वाकडेवाडी शिवाजीनगर पुणे येथे उतरुन राहते घरी गेले नमुद वेळी फिर्यादी यांची सुन प्रवासात नेलेले बॅगेतील सामान काढुन ठेवत असताना प्रवासी बॅगेत ठेवलेले २,५२,०००/- रुपये किं.चे सोन्याचे दागिने व रोख रक्कम प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची नजर चुकवून चोरुन नेले आहे.(फिर्यादी यांची नात वय ०९महिने ही आजारी असल्या कारणाने फिर्याद उशीर दिली) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.आण्णा गुंजाळ मो.नं.९९७०७४६४५६ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**